महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ 24 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 266 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




थोडक्यात महत्वाचे

## कल्याण पश्चिमेत नव्या रुग्णालयांची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. २३ (वार्ताहर) :** शहरातील वाढती लोकसंख्या पाहता भविष्याचा विचार करता इथल्या आरोग्य यंत्रणेत सुधारणा होणे आवश्यक बनले आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण पश्चिमेत महिला आणि बाल रुग्णालय, ५०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्यासह रुक्मिणीबाई रुग्णालयात ट्रॉमा केअर सुविधा सुरू करण्याची मागणी युवासेना जिल्हा चिटणीस वैभव विश्वनाथ भोईर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेत निवेदन दिले आहे. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघ हा चोहोबाजूंनी वाढत आणि विस्तारत आहे. रस्ते आणि रेल्वेच्या चांगल्या कनेक्टिव्हिटीमुळे याठिकाणी राहण्यासाठी येणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे; मात्र इतक्या मोठ्या लोकसंख्येला आवश्यक असणारी आरोग्य यंत्रणा तोकडी पडत आहे. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघात नव्या आरोग्य यंत्रणांची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात नवीन शासकीय महिला आणि बाल रुग्णालय मंजूर करणे, कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात ५०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारणे आणि रुक्मिणीबाई रुग्णालयात ट्रॉमा केअर सुविधा मंजूर करण्याची मागणी वैभव भोईर यांनी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## ठाण्यात म्हाडाचे सात मजली महिला वसतिगृह आणि वृद्धाश्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : म्हाडाच्या कोकण मंडळाने ठाण्यात नोकरदार महिलांसाठी एक वसतिगृह आणि एक वृद्धाश्रम बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार माजीवडा येथील विवेकानंद नगर अभिन्यासातील (लेआऊट) दोन स्वतंत्र भूखंडांवर सात मजली वृद्धाश्रम आणि सात मजली वसतिगृह बांधण्यात येणार असून त्यासाठी आठवड्याभरात कोकण मंडळाकडून निविदा मागविल्या जाणार आहेत. नीती आयोगाच्या शिफराशीनुसार मुंबई महानगर प्रदेशाचा (एमएमआर) विकास ग्रोथ हब म्हणून केला जात आहे. या ग्रोथ हबच्या आराखड्यानुसार एमएमआरमध्ये २०३० पर्यंत आठ लाख घरांची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.महिला, वृद्ध, विद्यार्थी, मजूर अशा घटकांनाही हक्काचा निवारा देण्याच्यासाठी प्रकल्प राबविण्याची शिफारस आराखड्यात करण्यात आली आहे. त्यानुसार म्हाडाने मुंबई आणि ठाण्यात नोकरदार महिलांसाठी, शालेय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी वृद्धाश्रम बांधण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईत या पूर्वीच म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या माध्यमातून काळाचौकीतील जिजामाता नगर येथे १८ मजली विद्यार्थी वसतिगृह बांधण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. लवकरच म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाकडून ताडदेव येथे नोकरदार महिलांसाठी २३ मजली वसतिगृह बांधण्याच्या कामास सुरुवात होणार आहे.


## डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठनाच्या माध्यमातून रायते गावात महास्वछता अभियान



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान व श्री.समर्थ बैठक रायते यांच्या माध्यमातून आज रायते गावात महास्वछता मोहिम राबविण्यात आली यात गावातील प्रमुख रस्ते,मंदिर, जि.प.शाळा,बैठक हॉल परिसर, ग्रामपंचायत कार्यालय,रायते विभाग हायस्कूल व परिसरातील कचरा उचलुन साफसफाई करण्यात आली,यात समर्थ बैठकितील श्री. सदस्य, महिला सदस्यां यांनी मोठया संख्येने भाग घेतला यास्वच्छता मोहिमेला रायते गावच्या सरपंच,माजी सरपंच,सदस्य,नागरिक, स्वच्छता अभियानास उपस्थित राहुन ग्रामपंचायत तर्फे घंटा गाडीची व्यवस्था करण्यात आली होती,प्रतिष्ठानच्या माध्यमातून नेहमीच समाज कार्यासाठी वेगवेगळे सामाजिक अभियान राबविले जातात.याबद्दल त्यांनी प्रतिष्ठानाचे आभार मानले

# उत्तरप्रदेशाच्या धर्तीवर कुंभमेळा कायदा - मुख्यमंत्री



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज रविवारी (दि. 23) नाशिक दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी त्र्यंबकेश्वर मंदिराचे दर्शन घेतले. तसेच कुशावर्त तिर्थाची पाहणी देखील केली. मुख्यमंत्र्यांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे 2027 साली होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा आढावा घेतला. यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुंभमेळ्यासाठी अॅक्शन प्लॅन सांगितला आहे. उत्तर प्रदेशच्या धर्तीवर कुंभमेळा कायदा तयार करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज त्र्यंबकेश्वरला जाऊन दर्शन घेतले. परिसराची पाहणी केली. त्र्यंबकेश्वरचा विकास आरायखडा तयार केला आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा विकास झाला पाहिजे. देशभरातील लोक तिथे येतात. कॉरिडॉर तयार करणे, पार्किंग, शौचालय तयार करणे, तिथले मंदिरं आणि कुंडाची दुरूस्ती करणे. गे ब्रह्मगिरी परिसरात नॅचरल ट्रेल्स तयार करायच्या आहेत. एसटीपीचे जाळे तयार करून पाणी शुद्ध राहिले पाहिजे, या दृष्टीने एक आराखडा तयार करण्यात आला आहे. कुठल्याही परिस्थितीत सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आधी त्याचे काम पूर्ण करायचे, असा प्रयत्न केला जाणार आहे. या कामाला खूप मोठ्या प्रमाणात निधी लागणार आहे. पण आम्ही राज्य सरकार म्हणून निर्णय घेतलाय की, याला कुठल्याही निधीची कमतरता पडू द्यायची नाही. त्यामुळे कामांसाठी आवश्यक निधी आम्ही उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

### कुशावर्त तिर्थाच्या पाण्यावर नाराजी

**कुशावर्त तिर्थाची पाहणी करून आपण तेथील पाण्याबाबत नाराजी व्यक्त केली. याबाबत विचारले असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागील काळातच मी काही तज्ञांची टीम तिथे पाठवली होती. त्यांनी आम्हाला याबाबत उपाययोजना सागितलेल्या आहेत. त्यांनी ज्या काही उपाययोजना सागितल्या आहेत, त्यावर आम्ही निर्णय करत आहोत. त्यांचा असा दावा आहे की तेथील पाणी ते स्वच्छ करू शकतात. त्यामुळे त्यातला जो उत्तम पर्याय असेल तो आम्ही स्वीकारून तत्काळ कार्यवाही करू, असे त्यांनी सागितले.**

**त्र्यंबकच्या साधू संतांनी अशी मागणी केली आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच ुकंभमेळ्याची जबाबदारी घ्यावी, असे विचारले असता ते म्हणाले की, मुख्यमंत्री म्हणून माझी जबाबदारी आहेच. पण, आपण आता उत्तर प्रदेशने ज्याप्रकारे या ुकंभमेळ्याचा कायदा तयार केला आणि ुकंभमेळा प्राधिकरण तयार केलं. त्याच धर्तीवर आपण देखील कायदा तयार करत आहोत. आपणही ुकंभमेळा प्राधिकरण तयार करून याला कायदेशीर चौकट देत आहोत, - देवेंद्र फडणवीस**

## जमीन घोटाळा मुद्द्यावर आ. किसन कथोरेकडून विधानसभेत लक्षवेधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. २३ (बातमीदार):** महापालिका क्षेत्रातील शिवाजीनगर, गावदेवी इथे जमीन अवैध पद्धतीने नावावर केल्याच्या मुद्दा विधिमंडळात गाजला. शुक्रवारी (ता. २१) रोजी मुरबाडचे आमदार किसन कथोरे यांनी यावर प्रश्न उपस्थित केला होता. याला उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उत्तर दिले. यात संबंधितांना सात कोटींचा दंड ठोठावल्याचे उदय सामंत यांनी स्पष्ट केले. महापालिका हद्दीतील एका जमीन बेकायदेशीरपणे नावावर करण्याचा आणि त्यावर टीडीआर घेतल्याप्रकरणी विधिमंडळात चर्चा झाली. याप्रकरणी दोन तलाठ्यांवर गुन्हा दाखल केला असून, दुसऱ्या दोन व्यक्तींना सात कोटींचा दंड सुनावला गेला आहे. याप्रणी उच्च न्यायालयात जनहित याचिकादेखील दाखल केली आहे.

आमदार किसन कथोरे यांनी याप्रकरणी विधिमंडळात शुक्रवारी म्हटले की, कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील शिवाजीनगर गावदेवी येथील जुना सर्व्हे नंबर ३०५ व नवीन सर्व्हे नंबर ३२ ही जमीन विकास योजनेतील आरक्षणात बाधित आहे. याच्या जमीन मालकांनी सादर केलेल्या मालकी हक्कानुसार, तपासणी करून मालकाने टीडीआर दिल्याचे मला दिलेल्या उत्तरात म्हटले आहे. तसेच याच लगतचा सर्व्हे नंबर ३२, ३३६ अ ही शासकीय जमीन आणि सर्व्हे नंबर ३१ हा खासगी मालकीचा आहे. या दोन्ही सर्व्हे नंबरच्या अधिकार अभिलेखात खाडाखोड केली आहे. अशा प्रकारे बेकायदा ही जमीन आपल्या नावावर करून टीडीआर घेतला आहे. याबाबत लोकआयुक्त कार्यालयाकडे आणि उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्याचेही मला दिलेल्या उत्तरात म्हटले आहे.



विधिमंडळात प्रश्न विचारताना आमदार किसन कथोरे म्हणाले की, "सर्व्हे नंबर ३१ व ३२ यावर उल्लेख केलेल्या दोन्ही सर्व्हे नंबरच्या अधिकार अभिलेखात खाडाखोड केलेल्या तलाठी किंवा संबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे, हे सांगितले आहे. कधीपासून हा गुन्हा दाखल आहे, त्याचा तपास काय झाला आणि त्यावर कारवाई काय झाली? तसेच याबाबत महापालिकेच्या तत्कालीन अधिकाऱ्याने संगनमताने आर्थिक भ्रष्टाचार केला आहे. त्यामुळे याची सविस्तर चौकशी करून याचिकेच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाच्या निकालाला अधीन राहून संबंधितांवर कारवाई कधीपर्यंत करण्यात येईल, असा प्रश्न केला. कथोरेंच्या या प्रश्नाला सरकारच्या वतीने उत्तर देताना उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, "भोईर आणि केदार नावाच्या दोन तलाठ्यांवर गुन्हे दाखल झालेले आहेत. दुर्दैवाने भोईर यांचे निधन झाले आहे आणि केदार निवृत्त झाले आहेत. यावर सात कोटी रुपयांचा दंड नितीन जयराम छाया आणि प्रफुल्ल शहा यांना लावलेला आहे. त्यांना जो चुकीच्या मार्गाने टीडीआर लावला होता, त्याची वसुलीदेखील करण्याचा निर्णय संबंधित यंत्रणेने करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ज्या दोघांवर गुन्हा दाखल झाला होता, त्यातील एकाचे निधन झालेला आहे."

## मुंबईतील दोघांचा उल्हासनदीत बुडून मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** धुळवडीच्या दिवशी बदलापुरात उल्हास नदीत बुडून चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच मुंबईच्या आणखी दोन तरुणांचा उल्हासनदीत बुडून मृत्यू झाला आहे. विवेक तिवारी (१८) आणि विनय शहा (१७) अशी या दोघांची नावे असून ते मुंबईतील पवई हिरानंदानी आयटी पार्क परिसरात राहणारे होते.

विवेक आणि विनय हे दोघे मित्र शनिवारी फिरण्यासाठी उल्हास नदीच्या वसत बंधाऱ्यावर आले होते. तेथे पाण्यात पोहत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडाले. याबाबत माहिती मिळताच अंबरनाथ अग्निशमन दलाचे अधिकारी भागवत सोनोने यांनी दलासह घटनास्थळी धाव घेतली.

सुमारे तीन तास शोध घेतल्यानंतर दोन्ही तरुणांचे मृतदेह अग्निशमन दलाच्या हाती लागल्याची माहिती भागवत सोनोने यांनी दिली. दरम्यान, उल्हासनदीत बुडून मृत्यू होण्याच्या अशा दुर्दैवी घटनांना आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होते आहे. अनेक जण पर्यटनाच्या हौसे खातर उल्हास नदीत पोहण्यासाठी उतरतात. अनेकांना नदीची खोली माहिती नसते. त्यामुळे पाण्याचा अंदाज येत नसल्याने अनेक जण पाण्यात बुडत आहेत. अनेक जण धाडस करत निर्मनुष्य ठिकाणी पोहण्यासाठी जातात. त्यामुळे अशा काही ठिकाणी फलक लावण्याची मागणी केली जाते आहे.

## भिवंडी तालुक्यातील ५० टक्के शेतकरी फार्मर आयडी पासून वंचित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** शासनाच्या विविध योजनांचा लाभ जलदगतीने व परिणामकारकरीत्या शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे, याकरीता केंद्र शासनाच्या अॅग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना फार्मर आयडी कार्ड देण्यात येत आहे. मार्च महिन्याचे काही दिवस शिल्लक असताना या योजनेंतर्गत भिवंडी तालुक्यातील निम्मे शेतकऱ्यांची नोंद न झाल्याने शेतकऱ्यांना फार्मर आयडी कार्ड मिळालेले नाही. शेतकऱ्यांची त्यामुळे नोंद जलदगतीने होण्यासाठी शासनाने हे काम स्थानिक शेतकऱ्यांच्या सहकारी बहुद्देशीय सोसायट्यांकडे सोपविण्याची मागणी शेतकऱ्यांकडून वाढू लागली आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक शेतकऱ्यांची नोंद स्थानिक विविध बहुद्देशीय सहकारी संस्था आणि कार्यकारी सहकारी संस्था या संस्थेमध्ये असते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आयडी कार्डासाठी त्यांच्याकडून सहकार्य घेणे जरुरी होते. परंतु शासनाने हे काम कृषी विभागाकडे आणि महसूल विभागाकडे सोपविल्याने त्यांच्यामार्फत परिणामकारक हा उपक्रम न राबविल्याने तालुक्यातील अर्धे अधिक शेतकऱ्यांची नोंद शासन दरबारी झालेली नाही. मार्च अखेर तालुक्यातील संपूर्ण शेतकऱ्यांची नोंद शासनदरबारी होणे शक्य होणार नसल्याने शेतकऱ्यांची नोंद करण्यासाठी मुदतवाढ अपेक्षित असल्याची माहिती ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी दिली.

**भिवंडी तालुक्यात एकूण ३९,८५५ शेतकरी असून त्यापैकी १३१६८ शेतकऱ्यांनी फार्मर आयडी कार्डासाठी नोंदणी केली आहे. सध्या शेतकऱ्यांना फार्मर आयडी कार्ड देण्यासाठी नोंदणीचे काम महा इ-सेवा केंद्रामधून केले जात आहे. तसेच भिवंडी महसूल विभाग आणि कृषी विभागाने देखील ग्रामीण भागात शिबिरे आयोजित करून शेतकऱ्यांची कार्डसाठी नोंदणी सुरू ठेवली आहे.**

**- ज्ञानदेव शिंदे, तालुका कृषी अधिकारी**

**भिवंडी तालुका मोठा असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची नोंद स्थानिक शेतकऱ्यांच्या कार्यकारी सहकारी सोसायट्यांमध्ये असते. त्यांच्याकडे फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांची नोंदणीचे काम दिले असते तर तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्यांची नोंद होऊन त्यांना शासनाच्या योजनेचा लाभ घेता आला असता.**

**- यशवंत म्हात्रे, सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, भिवंडी**

## सहा दिवसांनंतर नागपूर पूर्वपदावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नागपुरात 17 मार्चच्या रात्री दोन गटात हिंसाचार झाला होता. धार्मिक दंगलींचा फारसा इतिहास नसलेल्या शांत शहर अचानक पेटले होते. या हिंसाचारात एक जणाचा मृत्यू झाला होता. 20 दुचाकी, 40 चारचाकीचे आणि 2 क्रेन जाळण्यात आल्या आहेत. अनेकांची घरे जाळण्यात आली होती. या हिंसाचार प्रकरणात 105 जणांना अटक करण्यात आली होती. त्यात काही अल्पवयीम मुली आहेत. या प्रकरणी आता पोलिसांनी नागरिकांना चांगली बातमी दिली आहे. 23 मार्च रोजी दुपारी 3 वाजेपासून नागपूर शहरातील संचारबंदी पूर्णपणे उठवण्यात आली आहे. नागपुरात संचारबंदी पूर्णपणे उठवली आहे. त्यामुळे आता जनजीवन पूर्वपदावर येत आहे. 23 मार्च रोजी दुपारी 3 वाजता संचारबंदी पूर्णपणे उठवल्याचे नागपूर पोलिसांनी सांगितले. परंतु काही ठिकाणी पोलीस बंदोबस्त कायम असणार आहे. संवेदनशील ठिकाणी हा बंदोबस्त असणार आहे. तसेच परिस्थिती पाहून बंदोबस्तात बदल होणार असल्याचे पोलिसांनी माध्यमांना सांगितले. नागपूर हिंसाचार प्रकरणात सोशल मीडियावर भडकवणारे व्हिडिओ टाकणाऱ्या हमीद इंजिनिअर अन् मोहम्मद सहजाद खान यांना अटक करण्यात आली आहे. नागपूर शहरातील हिंसाचाराच्या घटनेनंतर शहरातील बाजारपेठांमध्ये शुकशुकाट होता. संचारबंदी लावल्याने हिंसाचार ग्रस्त भागात पोलीस बंदोबस्तामुळे वर्दळ थांबली होती. परंतु आता शहर पूर्वपदावर येत आहे. नागपुरात बाजारपेठही सुरु झाली आहे. वर्दळ सामान्य होऊ लागली आहे. नागपूर पोलिसांनी संचारबंदी उठवली असली तरी परिस्थितीवर पूर्णपणे लक्ष ठेवून आहेत. महाल, गांधीबाग, इतवारी या भागात नागपूर शहरातील मोठ्या आणि जुन्या होलसेल बाजारपेठ आहेत, त्या ठिकाणी पोलिसांचे लक्ष आहे. नागपुरातील संचारबंदीमुळे पहिल्याच दिवशी सुमारे 250 कोटींचा व्यापार प्रभावित झाला होती.

## आज उल्हासनगर महापालिकेचा अर्थसंकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २३ (बातमीदार) :** महापालिकेच्या स्थापनेपासून पहिल्यांदा महिला आयएएस अधिकारी असणाऱ्या मनीषा आव्हाळे यांनी आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला आहे. या वर्षीचा अर्थसंकल्प त्यांच्या हस्ते मंगळवारी (ता. २५) सादर केला जाणार आहे. लेखा विभागाच्या यंत्रणेचे काम पूर्ण झाल्याने अर्थसंकल्पाची तारीख निश्चित करण्यात आली आहे.




मागच्या वर्षी महापालिकेचा अर्थसंकल्प हा ९७७ कोटी रुपयांचा होता. यावर्षी अर्थसंकल्पात वाढ होणे अपेक्षित आहे. सरकारकडून दरमहा येणाऱ्या २२ कोटी ११ लाख रुपयांच्या अनुदानातून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न मिटतो. मुख्य उत्पन्नाचे स्त्रोत हे मालमत्ता कर विभाग, नगररचना विभाग असले, तरी आणखी कोणत्या प्रकारे उत्पन्न वाढवले जाणार हे अर्थसंकल्पात समोर येणार आहे. रस्त्यांव्यतिरिक्त इतर कोणती विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. शाळा, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आदींसाठी किती निधीची तरतूद केली जाणार आहे. पाणी, कर, बांधकाम व बाजार परवान्यांचे शुल्क वाढवले जाणार आहे का, ही आकडेवारीही अर्थसंकल्पात स्पष्ट होणार आहे.

सध्या प्रशासक राजवट असल्याने आणि महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापतीसह लोकप्रतिनिधी नसल्याने सर्वेसर्वा या आयुक्त तथा प्रशासक मनीषा आव्हाळे आहेत. त्यांच्याकडून शहर विकासाचा, नागरिकांच्या हिताचा अर्थसंकल्प अपेक्षित आहे. आयुक्तांची एकंदरीत कार्यप्रणाली व शेवटच्या अभय योजनेची केलेली घोषणा आणि त्याला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद याचा विचार करता अर्थसंकल्पातून त्यांच्याकडून अनेक आशा आहे.



वाचक मनोगत

## न्यायदेवतेवरील विश्वासाची होळी ; लोकशाहीला घातकच

दिल्ली उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या घरी करोडो रुपयांची रोकड या वृत्ताच्या अनुषंगाने जनभावना मांडण्यासाठी हा प्रपंच. शंका -संशयाला पुराव्याची पुष्टी मिळाली की संशयाचे विश्वासात रूपांतर होत असते . याउलट विश्वासाला संशयाचे ग्रहण लागले की विश्वासाला ओहोटी लागून विश्वासाचे संशयात रूपांतर होत असते . भारतीय लोकशाहीचे सर्वच स्तंभ भ्रष्ट झालेले आहेत यावर १४० करोड देशवासीयांचा पूर्ण विश्वास असला तरी मा . न्यायदेवतेच्या बाबतीत त्याला खात्री नसून केवळ शंका होती . दिल्ली उच्च न्यायालयाच्या निवासस्थानी होळीच्या दिवशी लागलेल्या आगीच्या घटनेतून समोर

आलेल्या करोडो रुपयांच्या रोकडीमुळे मा . न्यायव्यस्थेवरील विश्वासाला 'ग्रहण' ; लागलेले आहे असे म्हटले तर ते अतिशोयुक्तीचे ठरणार नाही आणि त्यापुढे म्हणावयाचे झाल्यास तो मा . न्यायदेवतेचा अपमान देखील ठरणार नाही . कधी कधी दुर्घटना हि ;व्यवस्था परिवर्तनासाठी ; कारणीभूत ठरत असते आणि आगीची दुर्घटना हि देखील अशाच पद्धतीने भारतीय न्यायव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडण्यास कारणीभूत ठरू शकते . किंबहुना तसेच व्हावे अशी

१४० करोड देशवासीयांची अपेक्षा -आकांशा आहे . "तारीख पे तारीख हि कार्यपद्धती न्यायालयाच्या 'न्याय" देण्याच्या

प्रक्रियेतील सर्वात मोठा अडथळा ठरतो आहे हे एव्हाना सर्वांच्याच लक्षात आलेले आहे . या पार्श्वभूमीवर उपलब्ध तंत्रज्ञानाच्या मदतीने पुराव्यांची मदत घेत कालबद्ध न्याय प्रक्रिया अंमलात आणणे हाच मा . न्यायदेवतेवरील विश्वास घट्ट करण्यासाठीचा सर्वोत्तम पर्याय ठरतो . न्यायमूर्तींच्या घरी सापडलेल्या करोडो रुपये प्रकरणाचा जो निकाल लागायचा असेल तो लागेल . भारतीय नागरिकांचे सर्वोच्च न्यायालयाला एकच विनंती असेल की , या दुर्घटनेला संधी मानून भारतीय न्यायव्यवस्थेत कालसुसंगत बदल करण्यासाठीचे आवश्यक ते सर्व उपाय तातडीने योजिले जावेत आणि त्याची तितक्याच प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली जावी. न्याय व्यवस्थेची कार्यपद्धती का प्रश्नांकित आहे यासाठीचे एक प्रातिनिधिक उदाहरण पाहू यात . एका नागरिकाने थकीत कर्जामुळे लिलावात निघालेली सदनिका विकत घेण्यासाठी १५ लाख रुपयांची रक्कम जमा केली . पुढे बँकेने ती सदनिका अन्य व्यक्तीला विकली . १५ लाख रुपये जमा करणाऱ्या व्यक्तीने बँकेला माझी रक्कम परत करा अशी याचना करून देखील बँकेने पैसे न दिल्याने त्याने न्यायालयात याचिका दाखल केली . गेल्या ४ वर्षांपासून सदरील याचिका प्रलंबित आहे. अशा पद्धतीने 'न्याय पद्धतीचाच निकाल लागतो, न्याय व्यवस्थेवरील विश्वासाला ग्रहण लागते हे ध्यानात घ्यायला हवे.

सुधीर लक्ष्मीकांत दाणी . बेलापूर नवी मुंबई

# या प्रकरणाची मला माहिती नाही !

## दिशा सालियान प्रकरणी अजित दादांची प्रतिक्रिया

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दिशा सालियान मृत्यू प्रकरण पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात तापले आहे. दिशा सालियनच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेनंतर हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले. या याचिकेत दिशाची हत्या झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यात आदित्य ठाकरे यांच्यावर आरोप होत आहेत. दोन दिवसांपासून हे प्रकरण चर्चेत आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनातही सत्ताधाऱ्यांनी ठाकरे गटावर टीकेची झोड उठवली होती. आता या प्रकरणावर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या एका बैठकीनिमित्त अजित पवार पुण्यात होते. या बैठकीनंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी त्यांना दिशा सालियन प्रकरणाबाबत विचारले. त्या प्रकरणातील बातम्या मी वाचत आहे. याबाबत मला जास्त काही माहिती नाही. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या उत्तरात आणि पुरवणी मागण्यांत मी कालपर्यंत व्यस्त होतो.

या ज्या गोष्टी आता चालल्या आहेत ना माझं म्हणणं फक्त इतकंच आहे की बातम्या देताना वस्तुस्थितीला धरून आम्ही बोललं पाहिजे. तसेच बातमी देणाऱ्यानेही वस्तुस्थितीला धरुन बातमी दिली पाहिजे. आता प्रकरण न्यायालयात गेलं आहे. आता न्यायालय काय तो निर्णय देईल. एखाद्या व्यक्तीला ज्यावेळी वाटू लागतं की त्याला न्याय मिळालेला नाही त्यावेळी तो न्यायालयात जाऊ शकतो, असे अजित पवार म्हणाले.

जयंत पाटील अन् अजित पवार यांच्यात बंद दाराआड चर्चा, अर्ध्या तासात कोणती खलबतं?

### जयंत पाटील भेटीवर काय म्हणाले अजितदादा?

आज सकाळी जयंत पाटील यांच्याबरोबर झालेल्या भेटीच्या संदर्भात विचारले असता अजित पवार म्हणाले, मीडीयाने काय बातम्या लावाव्यात हा त्यांचा प्रश्न आहे. पण वस्तुस्थिती पाहून बातम्या देत चला. आमची व्हीएसआयची बैठक होती. त्यासाठी एकत्रित आलो होतो. आजच्या व्हीएसआयच्या बैठकीत एआयचा महत्वाचा विषय होता. एआयचा फायदा होत आहे. एआयचा वापर करणे काळाची गरज आहे. एआयचा वापर करून ऊसाचे उत्पादन वाढले आहे. आम्ही त्याचा वापर फळबागा आणि इतर पिकांसाठी देखभाल करणार आहोत. आजची नेहमीप्रमाणे आमची बैठक होती असे अजित पवार यांनी सागितले.

**बहुचर्चित दिशा सालियन प्रकरणामुळे शिवसेना नेते आदित्य ठाकरे अडचणीत आले आहेत. दिशाच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, त्यात दिशावर अत्याचार करुन तिची हत्या केल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणी भाजप खासदार नारायण राणे यांनी पत्रकार परिषद घेऊन आदित्य ठाकरेंवर गंभीर आरोप केले. त्यानंतर आता ठाकरेंनी राणेंच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे. काय म्हणाले आदित्य ठाकरे? मीडियाशी संवाद साधताना आदित्य ठाकरे म्हणाले की, 'त्यांना द्यायचे माझे काम नाही. त्यांना पगारच इतरांवर घाण आरोप करायचा मिळतो. आपण आधी पाहिले असेल, माझ्या परिवारावर, वडिलांवर, पक्षावर आरोप केले होते. त्यांना पक्ष सोडून किती वर्ष झाली, मात्र त्यांच्या मनातून आम्ही काय उतरत नाही. बोलू द्या त्यांना. पक्ष सोडल्यापासून ते आमच्यावर टीका करतात. पण कचऱ्यावर आपण लक्ष देत नाही, असा टोला आदित्य ठाकरे यांनी लगावला आहे.**



दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरे यांचे नाव घेऊ नये अशी विनंती करणारे उद्धव ठाकरे यांचे आपल्याला दोन फोन आले होते असा दावा खासदार नारायण राणे यांनी केला. राणे म्हणाले की, ही जी घटना घडली होती त्यावेळी एक फोन आला. मिलिंद नार्वेकरांनी सांगितले की उद्धव ठाकरेंना बोलायचे आहे. आदित्यचे नाव घेता त्याचा उल्लेख करू नये, अशी विनंती त्यांनी केली होती. मी म्हणालो, एका निरपराध मुलीची हत्या केली गेली, त्यामध्ये आरोपींना शिक्षा मिळावी, असे आमचे मत आहे. संध्याकाळी तुमची मुले कुठे जातात, त्याची काळजी घ्या. जुहूला माझ्या घराजवळ दिनो मोरिया राहतो, हे काय धुमाकूळ घालतात मला माहिती आहे. त्यामुळे तुम्ही त्याला सांभाळा असं मी बोललो. त्यावर ते म्हणाले की, तशी काळजी घेतो पण तुम्ही सहकार्य करा, असा गौप्यस्फोट राणेंनी केला आहे.

# शिक्षण विभागाच्या नव्या जीआरचा फटका उन्हाळी सुट्ट्यांचे गणित बिघडणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दरवर्षी मार्च किंवा एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात परीक्षा आटोपली की बच्चेकंपनी थेट मामाच्या गावी धूम ठोकतात. मात्र यावर्षी हजारो विद्यार्थ्यांचे हे गणित बिघडणार आहे. शिक्षण विभागाने नवीन जीआर काढत पहिली ते नववीची परीक्षा 5 ते 25 एप्रिल कालावधीत घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पालकांसह मुलांचा हिरमोड झाला असून मे महिन्यात एकाच वेळी गावाला जाणाऱ्यांची संख्या वाढणार असल्याने गाड्यांचे आगाऊ बुकिंग मिळताना नाकीनऊ येत आहे. त्यामुळे सरकारच्या या भोंगळ कारभाराविरोधात संताप व्यक्त होत आहे.

1 राज्यातील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा यंदा एकाच वेळी घेतल्या जाणार आहेत. याआधी या परीक्षा मार्च महिन्याच्या मध्यापासून ते एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला टप्प्याटप्प्याने घेतल्या जात होत्या. मात्र यावर्षी सर्वच शाळांमध्ये परीक्षा एकाच कालावधीत पार पडणार आहेत.

2 राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने याबाबत आदेश जारी केले असून त्यानुसार वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा ५ ते २५ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. दरवर्षी साधारण 15 एप्रिलनंतर अनेक मुले पालकांसह गावी जातात.

3 यावेळी मात्र सर्वांचेच गणित बिघडणार आहे. दुसरी गोष्ट म्हणजे ५ मेनंतर गावी जाणाऱ्यांची संख्या वाढणार असल्याने गाड्यांचे आगाऊ बुकिंग मिळताना अडचणी येत आहेत. तसेच ट्रॅफिक जामचा फटकादेखील बसण्याचा धोका

निकाल तयार करताना दमछाक उडणार

पहिली ते नववीची परीक्षा 5 ते 25 एप्रिल कालावधीत पार पडल्यानंतर निकाल लगेचच म्हणजे 1 मे रोजी घोषित केला जाणार आहे. यामुळे परीक्षा पार पडल्यानंतर पेपर तपासणी करून निकाल तयार करताना शिक्षकांची चांगलीच दमछाक होणार आहे. रायगड जिल्ह्याचा विचार करता सुमारे 4 हजार शाळांमधील सुमारे तीन ते साडेतीन लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल पाच दिवसांत तयार करण्याचे आव्हान शिक्षकांसमोर असेल. शिवाय विद्यार्थ्यांची उन्हाळी सुट्टी कमी होणार असून एप्रिल महिन्याच्या भयंकर उकाड्यात त्यांना शाळेत उपस्थित राहावे लागणार आहे.




# इंक्रेडिबल प्रीमियम लीग

**आयपीएलमध्ये सहभागी असलेल्या दहा पैकी 9 संघांनी कर्णधारपदी भारताच्या युवा खेळाडूंची निवड केली आहे. फक्त हैद्राबाद या संघाने कर्णधार म्हणून ऑस्ट्रेलियाच्या पॅट कमिन्सची निवड केली. उर्वरित नऊ संघाचे कर्णधार भारतीयच आहेत...**

जगातील सर्वाधिक महागडी आणि लोकप्रिय लीग म्हणून ओळखली जाणारी इंडीयन प्रीमियम लीग अर्थात आयपीएलच्या अठराव्या हंगामाची सुरुवात २२ मार्च पासून झाली असून पुढील दोन महिने आयपीएलचा थरार चालू राहणार असल्याने क्रिकेट प्रेमींसाठी ती मोठी मेजवानी ठरणार आहे. आयपीएलची सुरुवात २००८ साली झाली. म्हणजे आज आयपीएलला सतरा वर्ष पूर्ण झाली. या सतरा वर्षात क्रिकेटच्या मैदानात आणि मैदानाच्या बाहेर अनेक घडामोडी घडल्या पण आयपीएलची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही. आयपीएललाही मॅच फिक्सिंग सारखी किड लागली होती. मॅच फिक्सिंगचा आरोप झाल्याने काही खेळाडूंना कायमचे घरी बसवण्यात आले तर चेन्नई आणि राजस्थान या सारख्या लोकप्रिय संघावर दोन वर्षाची बंदी घालण्यात आली होती. मॅच फिक्सिंगमुळे आयपीएलला उतरती कळा लागेल असा अंदाज बांधला जात होता मात्र तो फोल ठरला उलट आयपीएल आणखी लोकप्रिय ठरली. कोरोनाचा फटका जसा इतर क्रीडा प्रकारांना बसला तसाच तो आयपीएललाही बसला. कोरोनाच्या सावटातही बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन केले. कधी देशात तर कधी परदेशात, कधी प्रेक्षकांशिवाय तर प्रेक्षकांसह आयपीएलचे आयोजन करून बीसीसीआयने क्रिकेट प्रेमींना आयपीएलचा थरार अनुभवण्याची संधी दिली. जगभरातील इतर लीग कोरोनामुळे ठप्प झाल्या असताना बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन करून जगापुढे व्यवस्थापनाचा आदर्श घालून दिला. सुरवातीला आठ संघात खेळली जाणारी ही स्पर्धा तीन वर्षापासून दहा संघात खेळली जात आहे. गुजरात टायटन आणि लखनौ सुपर जायंटस या दोन नव्या संघाची आयपीएलमध्ये एंट्री झाल्याने आयपीएलचा थरार आणखी वाढला आहे. विशेष म्हणजे यातील गुजरात टायटन या संघाने २०२२ साली पदार्पणातच विजेतेपद मिळवत अनेकांना अचंबित केले इतकेच नव्हे तर २०२३ साली देखील हा संघ अंतिम फेरीत पोहचला म्हणजे पदार्पणाच्या पहिल्या दोन वर्षातच विजेतेपद आणि उपविजेतेपद मिळवत या संघाने आपले कर्तुत्व दाखवून दिले आहे. आयपीएलमध्ये दहा संघ असले तरी आयपीएलवर चेन्नई आणि मुंबई या दोन संघाचेच वर्चस्व राहिले आहे. दोन्ही संघाने प्रत्येकी पाच विजेतेपद पटकावित आयपीएलवर आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे. या दोघांशिवाय कोलकाता संघाने तीनदा तर हैद्राबाद या संघाने दोनदा विजेतेपद मिळवले आहे. गुजरात या संघाने आपल्या पहिल्याच प्रयत्नात म्हणजे २०२२ ला विजेतेपद मिळविले तर राजस्थान रॉयल या संघाने आयपीएलच्या पहिल्या हंगामात म्हणजे २००८ साली विजेतेपद मिळविले. बंगळुरू, पंजाब, दिल्ली, लखनौ या सारख्या प्रबळ संघांना मात्र अद्याप एकदाही विजेतेपदाला गवसणी घालता आलेली नाही यावर्षी आयपीएलला नवा विजेता मिळेल का ? याची उत्सुकता क्रिकेटप्रेमींना लागली आहे. अर्थात यावर्षीही चेन्नई आणि मुंबई हेच दोन संघ विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार आहेत. याशिवाय कोलकाता, बंगळुरू आणि गुजरात हे देखील विजेतेपदाच्या शर्यतीत आहेत. कदाचित यावेळी एखाद्या नव्याच संघाने विजेतेपद पटकावून सर्वांना अचंबित केल्यास आश्चर्य वाटायला नको. या वेळेची स्पर्धा एका नव्या कारणाने देखील चर्चेत आहे ती म्हणजे या वेळी अनेक संघांनी आपले कर्णधार बदलले आहे. आयपीएलमध्ये सहभागी असलेल्या दहा पैकी ९ संघांनी कर्णधारपदी भारताच्या युवा खेळाडूची निवड केली आहे. फक्त हैद्राबाद या संघाने कर्णधार म्हणून ऑस्ट्रेलियाच्या पॅट कमिन्सची निवड केली. उर्वरित नऊ संघाचे कर्णधार भारतीयच आहेत. ज्या धोनी आणि रोहित शर्माने आपल्या संघाला पाच विजेतेपद मिळवून दिले त्यांना यावेळी फक्त खेळाडू म्हणून मैदानात उतरावे लागेल कारण मुंबईच्या संघ व्यवस्थापनाने रोहित शर्माच्या जागेवर हार्दिक पांड्याची कर्णधार म्हणून निवड केली आहे तर धोनीने स्वतः कर्णधार पदाचा त्याग केल्याने युवा ऋतुराज गायकवाडच्या गळ्यात चेन्नईच्या कर्णधारपदाची माळ पडली आहे. आरसिबी अर्थात बंगळुरू संघाने अनुभवी विराट कोहलीच्या जागी युवा रजत पाटीदारला संधी देत त्याच्याकडे बंगळुरू संघाचे नेतृत्व सोपवले आहे. गुजरात संघाच्या कर्णधार पदाची धुरा युवा शुभमन गीलच्या खांद्यावर आहे. मागील वर्षी कोलकाताचा कर्णधार असलेला आणि कोलकाताला तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवून देणारा युवा श्रेयस अय्यर यावेळी पंजाबचा कर्णधार बनला आहे तर मराठमोळा अजिंक्य रहाणे कोलकाताची धुरा सांभाळणार आहे. जीवघेण्या अपघातातून बचावलेला ऋषभ पंत लखनौचा कर्णधार आहे. संजू सॅमसन या युवा खेळाडूकडे राजस्थानची जबाबदारी आहे तर युवा अक्षर पटेल पहिल्यांदाच दिल्लीचे नेतृत्व करणार आहे.भारताच्या या युवा खेळाडूंवर कर्णधार पदाची जबाबदारी देऊन संघ मालकांनी त्यांच्यातील नेतृत्व गुणाला चालना दिली आहे. याच युवा खेळाडूंपैकी एखादा खेळाडू भविष्यात भारतीय संघाचे नेतृत्व करू शकतो म्हणजे भविष्यातील भारतीय संघाच्या कर्णधाराची पायाभरणी याच आयपीएल मधून होणार आहे. केवळ कर्णधारच नव्हे भविष्यातील संपूर्ण भारतीय संघच आयपीएल मधून निवडला जाईल. आज जे खेळाडू भारतीय संघात दिसतात ते सर्व खेळाडू आयपीएल मधूनच पुढे आले आहेत. भारतीय संघातील रविंद्र जडेजा, सूर्यकुमार यादव, शूभमन गिल, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, यजुवेंद्र चहल, वॉशिंगटन सुंदर, मोहंमद सिराज, मोहंमद शमी, संजू सॅमसन, ईशान किशन, ऋषभ पंत, वरुण चक्रवर्ती, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल असे सर्वच खेळाडू आयपीएलची देण आहे. आयपीएलमध्ये चांगली कामगिरी केल्यानेच या खेळाडूंना भारतीय संघात प्रवेश मिळाला. आयपीएल म्हणजे भारतीय संघात प्रवेश करण्याचे प्रवेशद्वार आहे त्यामुळेच आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी खेळाडू मैदानावर घाम गाळतात. आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करून भारतीय संघात प्रवेश मिळवण्याचे स्वप्न सारे खेळाडू पाहतात ते स्वप्न यशस्वी करण्यासाठी ते जीवाचे रान करतात त्यामुळेच आयपीयलचे सर्व सामने रंगतदार होतात आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येतो. यावर्षीही आयपीएलचे सर्व सामने रंगतदार होतील आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येईल यात शंका नाही.

श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे



सोमवार
२४ मार्च २०२५

**मेष**
संभ्रमाची स्थिती संपेल. आज तुम्हाला काही कामातून फायदा होणार अपूर्ण काम पूर्ण होईल.

**वृषभ**
आज खर्चात वाढ झाल्याने बचत करणे कठीण होईल. आज भाग्य तुम्हाला पूर्ण साथ देईल.

**मिथुन**
जोडीदार काहीतरी करेल ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. व्यवसायात फायदेशीर गोष्टी समोर येतील.

**कर्क**
भविष्यात फायदेशीर ठरतील असे निर्णय घ्याल. काही नवीन काम सुरू करणे तुमच्यासाठी हितवाह होईल.

**सिंह**
आर्थिक लाभाच्या नवीन शक्यता निर्माण होतील. अभियंत्यांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**कन्या**
या राशीच्या लोकांनी आज हुशारीने काम केले तर तुम्हाला नक्कीच फायदा होईल. त्रास नकोसा होईल.

**तूळ**
बँकिंग क्षेत्राशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे. पदोन्नतीची संधी मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक**
दिवस तुमच्यासाठी चांगला जाईल. आर्थिक बाजू जोमाची राहील. पालकांचे मत प्रभावी ठरणार

**धनु**
कुठेतरी सहलीला जात असाल तर ते फायदेशीर ठरणार आहे. आज आरोग्य थोडे ढासळू शकते.

**मकर**
वेळीच काळजी घेतल्याने आजार लवकर बरा होईल. तुम्ही प्रवास करत असाल तर काळजी घ्या.

**कुम्भ**
आज तुमची मेहनत फलदायी ठरेल. तुमचे मन अध्यात्मात अधिक व्यस्त राहील. देवघरात फूल ठेवा.

**मीन**
आज तुम्ही अधिक प्रेरित व्हाल, आज तुमचा प्रभाव वाढेल. जुना तणाव संपुष्टात येईल.

# उद्घाटनापूर्वीच उध्वस्तीकरण

## ठाण्यातील बेकायदा हॉटेलवर पोलिस बंदोबस्तात कारवाई



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भाग असलेल्या ठाणे शहरातील येऊरच्या बेकायदा बांधकामांचा मुद्दा गेले अनेक वर्षे गाजत असतानाच, या भागात बेकायदा बांधकाम करून उभारण्यात आलेल्या हॉटेलचा शनिवारी शुभारंभ होणार होता. या बांधकामावरून पालिका प्रशासनावर गेल्या दोन दिवसांपासून समाजमाध्यांवर टिका होत होती आणि नव्या हॉटेलमुळे येऊरमध्ये धांगडधिंगा वाढणार असल्याची चर्चा होती. असे असतानाच, पालिकेने या बांधकामावर शनिवारी पोलिस बंदोबस्तात हातोडा मारला. त्यामुळे उद्घाटनाआधीच बेकायदा हॉटेल भुईसपाट झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

ठाणे येथील येऊरच्या जंगलात गेल्या काही वर्षांपासून बेकायदा बांधकामे उभी राहत आहेत. या बांधकामांचा मुद्दा सातत्याने चर्चेत येत आहे. प्रत्यक्षात मात्र त्यावर फारशी प्रभावीपणे कारवाई होताना दिसून येत नाही. त्याचबरोबर या परिसरात हॉटेल उभारण्यात येत असून तिथे पार्ट्या केल्या जात आहेत. यामुळे शांतता क्षेत्र असलेल्या येऊर भागात रात्रीच्या वेळेत ध्वनी प्रदुषण होत असून त्याचा त्रास येथील वन्यजीव प्राण्यांवर होत आहे.

रात्रीचा धांगडधिंगा थांबवा, अशी मागणी येथील स्थानिक रहिवाशांसह पर्यावरण प्रेमींकडून सातत्याने केली जाते. असे असतानाच, या जंगलात यापुर्वी गोल्डन स्वान कंट्री या नावाचे हॉटेल होते. या हॉटेल ठिकाणी ४० × ५० चौरस फुटाचे क्षेत्रफळात बांधकाम करण्यात आले होते. त्यामध्ये टर्फ, हॉटेल आणि इतर बांधकामे करण्यात आली होती. याठिकाणी गोल्डन स्वान कंट्री या हॉटेल नावात बदल करून लेवल अप नावाचे हॉटेल सुरू करण्यात येणार होते. त्याचा शुभारंभ शनिवारी होणार होता.

दरम्यान, या बांधकामाबाबत तक्रारी येताच पालिकेने याठिकाणी जाऊन पाहाणी केली होती. त्यावेळी पालिकेच्या पथकाने बांधकाम परवानगीची कागदपत्रे दाखविण्यास सांगितले होते. मात्र, संबंधितांनी कोणतीही कागदपत्रे सादर केली नव्हती. यामुळे पालिकेने कागदपत्रे पुन्हा सादर करण्याची संधी देऊनही संबंधितांनी कोणतीही कागदपत्रे सादर केली नव्हती. तसेच या बांधकामासाठी पालिकेकडून कोणतीही परवानगी देण्यात आली नसल्याची माहिती शहर विकास विभागाने अतिक्रमण विभागाला कळविले होते. त्यानुसार पालिकेच्या पथकाने शनिवारी पोलिस बंदोबस्तात हातोडा मारला. ही कारवाई आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, उपायुक्त (अतिक्रमण) शंकर पाटोळे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे यांच्या पथकाने केली. अंदाजे ४० × ५० चौरस फुटाचे लोखंडी अँगल्सच्या सहाय्याने केलेले अनधिकृत शेडचे बांधकाम काढण्यात आले.

# ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वीय सहाय्यक पल्लवी सरोदे यांचे अपघाती निधन



### ठाणे जिल्हा प्रशासनासाठी अत्यंत दुर्दैवी घटना

**ठाणे जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांशी अत्यंत सलोख्याचे संबंध असलेल्या, सर्वांना हसतमुखाने सर्व प्रकारची मदत करणाऱ्या, अतिशय सुस्वभावी, मेहनती, प्रामाणिक, कामात तत्पर, चेहऱ्यावर कायम स्मित हास्य असलेल्या पल्लवी सरोदे यांच्या अकाली मृत्यूमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या आत्म्यास शांती मिळो, अशी प्रार्थना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, जिल्ह्यातील इतर महानगरपालिकांचे आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, पोलीस अधीक्षक डॉ.डी.स्वामी यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील आणि ठाणे जिल्हा प्रशासनातील अन्य विविध शासकीय विभागांच्या अधिकारी कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, दि.23 :** ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी तथा जिल्हाधिकारी महोदयांच्या स्वीय सहाय्यक या पदावर कार्यरत असणाऱ्या सौ. पल्लवी सरोदे (वय 37 वर्ष) यांचे आज सकाळी हरिहरेश्वर समुद्र किनाऱ्यावर अपघाती निधन झाले. कार्यालयीन मैत्रिणींसह त्या हरिहरेश्वर या ठिकाणी सहली निमित्त गेल्या होत्या. तेथील समुद्रकिनारी त्या लाटेत अचानक ओढल्या गेल्या, त्यात त्यांचा मृत्यू झाला. ही दुर्घटना ठाणे जिल्हा प्रशासनातील सर्वांच्याच मनाला चटक लावून गेली.

सौ.पल्लवी सरोदे या ठाणे जिल्हा प्रशासनात 2012 रोजी लिपिक या पदावर रुजू झाल्या होत्या. मार्च 2024 मध्ये त्यांना सहाय्यक महसूल अधिकारी पदावर पदोन्नती मिळाली होती. त्या सध्या जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत होत्या.

स्व. सरोदे यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे पती, सासू- सासरे आणि मुलगा (वय 13 वर्ष) असा त्यांचा परिवार आहे.

# छत्रपती शिवरायांच्या नौदल संग्रहालयावर अजस्त्र होर्डिंगची टांगती तलवार



## उद्‌घाटनापूर्वी होर्डींग हटवा अन्यथा तोडून टाकू

### काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या हिंदवी स्वराज्याच्या आरमाराची स्थापना कल्याणच्या खाडीकिनारी केली. शिवरायांच्या या द्रष्टेपणाची नव्या पिढीला ओळख होण्याच्या उद्देशाने कल्याणच्या याच खाडीकिनारी भव्य "नौदल संग्रहालयाचे" सुरू असलेले काम आता अंतिम टप्प्यात आले. मात्र याचशेजारी उभारण्यात आलेल्या अजस्त्र होर्डिंगमुळे नौदल संग्रहालयाचे केवळ विद्रुपीकरणच होत नाहीये, तर घाटकोपरसारखी होर्डिंग दुर्घटना घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर नौदल संग्रहालयाचे उद्घाटन होण्यापूर्वी हे अजस्त्र होर्डिंग इथून हटवण्याची मागणी केली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे उभ्या महाराष्ट्राची अस्मिता असून हे होर्डिंग उद्घाटनापूर्वी हटवले नाही तर आम्हीच ते तोडून टाकू अशी संतप्त प्रतिक्रिया काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी व्यक्त केली आहे.

तत्कालीन ऐतिहासिक काळात कल्याणच्या खाडीचे असलेले सामरीक आणि भौगोलिक महत्त्व ओळखून छत्रपती शिवाजी महाराजांनी दुर्गाडी किल्ला खाडीकिनारी स्वराज्याच्या पहिल्या आरमाराची स्थापना केली. याचठिकाणी महाराजांच्या या दूरदृष्टीला आणि शौर्याला साजेसे एखादे स्मारक उभारण्यात यावे अशी तमाम शिवप्रेमी आणि कल्याणकर नागरिकांची गेल्या कित्येक वर्षांची मागणी होती.

या मागणीला खऱ्या अर्थाने न्याय देण्याचे काम केडीएमसीचे तत्कालीन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांप्रती असणारा नितांत आदर आणि कल्याणचे ऐतिहासिक महत्त्व ओळखून त्यांनी भारतीय नौदलाच्या मदतीने आधुनिक नौदल संग्रहालय उभारण्याची संकल्पना मांडली. तसेच ती पूर्णत्वास जाण्यासाठी आवश्यक असणारी सर्व ती शासकीय कार्यवाहीही डॉ. सूर्यवंशी यांनी लक्षपूर्वक पूर्ण केली. ज्याची फलश्रुती म्हणून आज छत्रपती शिवाजी महाराजांच्या अतुलनीय पराक्रमाची साक्ष देणाऱ्या या नौदल संग्रहालयाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या काही महिन्यात त्याचे लोकार्पण होण्याची शक्यता आहे. पाणबुडीच्या आकाराच्या संकल्पनेतून हे संग्रहालय उभारण्यात येत आहे.

मात्र एकीकडे या नौदल संग्रहालयाचे काम अंतिम टप्प्यात आले असताना दुसरीकडे याचशेजारी अतिशय अजस्त्र असे भलेमोठे होर्डिंग उभे राहिले आहे. ज्यामुळे या नौदल संग्रहालय आणि परिसराच्या सौंदर्याचे विद्रुपीकरण होत आहे. एकीकडे दुर्गा देवीचे मंदिर, त्याच्या पायथ्याशी उभी असलेली टी 80 युद्धनौका, या युद्ध नौकेसमोर असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि या तिन्ही महत्त्वाच्या वास्तूंच्या सानिध्यात उभे राहत असलेले हे नौदल संग्रहालय. अशी या संपूर्ण परिसराची भौगोलिक स्थिती पाहता नौदल संग्रहालयाशेजारी असणारे अजस्त्र होर्डिंग म्हणजे महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या या ऐतिहासिक वास्तूवरील काळा डाग दिसत आहे. तसेच या अवाढव्य होर्डिंगखाली छत्रपती शिवाजी महाराजांचे हे संग्रहालय झाकोळून जाणार आहे. परिणामी हे होर्डिंग इथून हटवण्याची मागणी होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज ही संपूर्ण महाराष्ट्राची अस्मिता आहे. त्यामुळे त्यांनी स्थापन केलेले कल्याणातील पहिले आरमार हे आमच्यासह सर्वच शिवप्रेमींसाठी स्वाभिमान आणि आमचा अभिमान आहे. या आरमाराच्या ठिकाणी उभ्या राहणाऱ्या नौदल संग्रहालयासाठीही आमच्या मनामध्ये नितांत आदर असून त्याची कोणत्याही प्रकारची विटंबना आम्ही सहन करणार नाही. एकीकडे शिवसेनेचे नेते सांगतात की आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे वारसदार आहोत. आणि दुसरीकडे त्यांच्याच राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांची अशा पद्धतीने विटंबना करायची ही एकप्रकारे दुतोंडी भूमिका आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने रीतसर हे अवाढव्य होर्डिंग स्वतःहून तिकडून हटवावे, अन्यथा आम्हीच ते तोडून टाकू असा संतापवजा इशारा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी दिला

# कल्याण शीळ रोडवरील 'त्या' जागेचा वाद शिगेला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण शिळ रोडवरील नेकणी पाडा येथील बस स्टॉप ला लागून असलेल्या 84 गुंठे जागेचा वाद शिगेला पोहोचला आहे. जागेच्या मालकी हक्कावरून दोन कुटुंब आमने-सामने आल्याने त्या ठिकाणी तणाव निर्माण झाला होता. मात्र मानपाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाद चिघळण्याची शक्यता असल्याने बंदोबस्त तैनात केला.

गेल्या वर्षभरापासून या जागेच्या वादातून बारस्कर व पाटील कुटुंबीयांमध्ये वाद सुरू आहे शनिवारी या जागेत कंटेनर केबिन ठेवण्याच्या वादातून दोन्ही कुटुंबीय आमने-सामने आल्याने कल्याण शीलरोड रस्त्यावर काही काळ वाहतूक कोंडी झाली तसेच गोंधळ निर्माण झाला. याची माहिती मिळतच मानपाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही कुटुंबीयांनी त्या ठिकाणी थांबू नये अशी समज दिली. याबाबत बारस्कर कुटुंबीयांकडून केदार चौधरी यांचे म्हणणे आहे की ही जागा आमच्या मालकी हक्काची आहे. पाटील कुटुंबीयांना या जागेत येण्यास न्यायालयाने मनाई केली आहे तरीसुद्धा ठाण्यातील एका व्यक्तींचा पाटील कुटुंबियांना पाठिंबा असल्याने पोलीस आमचं ऐकत नसल्याचे चौधरी यांनी म्हंटले आहे. तर पाटील कुटुंबीयांच्या वतीने जितेश पाटील यांनी सांगितले की, या जागेवर आमचा ताबा आहे. या प्रकरणात पोलिस बारस्कर कुटुंबीयांना मदत करीत आहेत. जागा आमची असताना आम्हाला बाहेर काढले. या प्रकरणी मुख्यमंत्री, पोलिस आयुक्तांकडे दाद मागणार आहोत. आम्हाला न्याय मिळाला पाहिजे. आमच्या जीवितास काही झाले तर त्याची जबाबदारी कोण घेणार ? असा सवाल उपस्थित केला आहे.

# शासकीय विश्रामगृहाचे ऑफलाईन देखील बुकिंग घ्यावे

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** राज्य सरकारने शासकीय विश्राम गृहाचे ऑनलाईन बुकिंग सुरू केल्याने बऱ्याच लोकांना समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शासकीय विश्रामगृहाचे ऑनलाईन सोबतच ऑफलाईन बुकिंग देखील घेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने शासकीय विश्राम गृहाच्या बुकिंग साठी ऑनलाईन वेबसाइट सुरू केल्या मुळे अनेक लोकांना विश्राम गृहाच्या बुकिंग साठी समस्या निर्माण झाली आहे. कारण बऱ्याच लोकांना ऑनलाईन बुकिंग करण्याचे ज्ञान नाही. तर बऱ्याच वेळेला ऑनलाईन



वेबसाइटचे सर्व्हर डाऊन असल्याकारणाने विश्राम गृहाचे पाहिजे त्या वेळेला बुकिंग होत नाही.

म्हणून राज्य सरकार च्या सार्वजनिक बांधकाम विभागाने ऑनलाईन सोबत पुर्वी प्रमाणे ऑफलाईन ही विश्राम गृहांची बुकिंग सुरू करावी ज्याने लोकांना सबस्टीट्युट ऑप्शन मिळावे आणि त्यांना विश्राम गृहाच्या बुकिंग साठी अडचण निर्माण होऊ नये.

नुकतेच सार्वजनिक बांधकाम विभागाने एका माहिती कायद्या अंतर्गत मागितलेली माहिती च्या उत्तरात असे सांगितले आहे की जर काही अडचणी मुळे विश्राम गृहाचे ऑनलाईन बुकिंग करता येत नसेल तर त्या व्यक्तीला संबंधित कार्यकारी अभियंता लेखी निवेदन देऊन ऑफलाईन बुकिंग करता येऊ शकते. परंतु त्या आदेशाचे पालन ठाणे सार्वजनिक बांधकाम विभाग करत नाहीत ही मोठी शोकांतिका आहे. राज्य सरकारने या विषयावर गांभीर्याने ठोस पावले उचलावीत अन्यथा या विषयावर आंदोलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# कल्याण तालुक्यातील गाळेगावात अल्पवयीन मुलीच्या छेडछाड प्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

### पोस्को आणि अट्रोसिटी ॲक्टअंतर्गत कारवाई

### गाळेगावमध्ये गुन्हेगारी वाढीचा गंभीर प्रश्न

### पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** कल्याण तालुका पोलिस स्टेशन हद्दीतील गाळेगाव धम्मदीप नगर येथे अल्पवयीन मुलीची छेडछाड करून तिला मारहाण केल्याच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी कल्याण तालुका पोलिसांनी चौघांविरोधात कठोर कारवाई करत पोस्को आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.पीडितेच्या आईच्या तक्रारीनंतर पोलिसांनी चौकशी सुरू केली असून, आरोपी अद्याप फरार आहेत. त्यांचा शोध सुरू असून ठाणे ग्रामीणचे पोलीस



उपअधीक्षक शिंदे यांनी लवकरच अटक करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

स्थानिक रहिवाशांच्या मते, गावात मोठ्या प्रमाणात अवैध गावठी दारू विक्री आणि जुगाराचे अड्डे सुरू आहेत, ज्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. तरुण पिढी चुकीच्या मार्गाला लागत असल्याने नागरिकांनी यासंदर्भात अनेकदा तक्रारी केल्या आहेत, मात्र ठोस कारवाई होत नसल्याचे आरोप आहेत.या घटनांमुळे कायद्याचा धाक कमी होत असून, गुन्हेगार निडर बनत आहेत. पोलिसांनी वेळीच कारवाई करून अशा प्रवृत्तीना आळा घालणे गरजेचे आहे, अन्यथा अशा घटना पुन्हा घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणात पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला असून, आरोपींच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे. त्यांचे कॉल डेटा रेकॉर्ड (CDR) मिळवण्याचे काम सुरू असून लवकरच त्यांना अटक केली जाईल, अशी माहिती पोलीस उपअधीक्षक शिंदे यांनी दिली.सदर घटना लक्षात घेता, स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी गावठी दारू विक्री व जुगारावर कारवाई करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, परिसरातील गुन्हेगारी वाढत राहील. नागरिकांनीही अशा अवैध कृत्यांविरोधात आवाज उठवत पोलिसांना सहकार्य करावे, जेणेकरून समाज सुरक्षित राहील.

# पनवेल महापालिकेतर्फे कुत्रे आणि मांजरांचे सर्वेक्षण



**रेबीजमुक्त पनवेल पालिका ही मोहीम राबविताना भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करणे गरजेचे आहे. ४० टक्क्याहून अधिक श्वानांचे पनवेलमध्ये निर्बीजीकरण झाल्याचे या अहवालातून समोर आले.– मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल पालिका**

******************************


**सर्वेक्षण अहवालामध्ये पालिका क्षेत्रात सुमारे १९ हजार भटके श्वान आणि ५ हजारांहून अधिक मांजरी असल्याचे वर्तविण्यात आले आहेत. सुमारे ९ हजार पाळीव श्वान पनवेलमध्ये असल्याचे नमुद करण्यात आले आहेत. श्वानांचे लसीकरण, अपघातांवरील नियंत्रण, जन्मदरावर सूक्ष्म नियंत्रण करण्यासाठी कुठल्या प्रभागातील किती श्वान आहेत याची माहिती मिळेल. तसेच पालिका सात वर्षांपासून निर्बीजीकरण करत असून त्याची फलनिष्पती समजण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले.– डॉ. वैभव विधाते, उपायुक्त**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** पनवेल महापालिकेने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (ए.आय.) माध्यमातून साडेचार महिन्यांत भटके श्वान आणि मांजरींचे सर्वेक्षण पूर्ण केले. नुकताच यासंदर्भातील अहवाल पालिका आयुक्तांना पालिकेच्या पशुवैद्याकीय अधिकाऱ्यांनी सादर केला.

राज्य व देशपातळीवर भटके श्वान आणि मांजरींचे ए.आय. माध्यमातून सर्वेक्षण करणारी पनवेल ही पहिली महापालिका ठरली आहे. पनवेल महापालिकेचे तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख आणि पालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांच्या कारकीर्दीत या सर्वेक्षणाच्या ठरावाला सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली.

१९ लाख रुपये खर्च करून पालिकेने श्वानांचे रेबीज निर्मूलन राष्ट्रीय कार्यक्रम योजनेअंतर्गत झायमॅक्स टेक सोल्युशन या कंपनीला इंडिया केअर तंत्रज्ञानाच्या साह्याने सर्वेक्षणाचे काम देण्यात आले. कंपनीने सर्वेक्षणासाठी प्राणीशास्त्र विषयातील २० पदवीधर तरुणांना यासाठी नेमले. पनवेल पालिका क्षेत्रातील २० वेगवेगळया प्रभागांचे १९५ परिभाग करून हे सर्वेक्षण करण्यात आले. एकाच रस्त्यावर किंवा एक गल्ली किंवा एका सोसायटीत वेगवेगळे तीन दिवस एकाच वेळी जाऊन हे सर्वेक्षण केले आहे.



# पाच जणांची हत्या करून पोलिसांना तेवीस वर्षे गुंगारा

## निरंजन उर्फ राजू शुक्ला अखेर गजाआड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई- ५ जणांची हत्या करून तब्बल २३ वर्ष दोन राज्यातील पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपीला अखेर गुन्हे शाखा २ च्या पथकाने केली आहे. निरंजन उर्फ राजू शुक्ला असे या आरोपीचे नाव आहे. त्याने मागील २३ वर्षांत ५ जणांच्या हत्या केल्या आहेत. विशेष म्हणजे तो एकदाही पोलिसांच्या हाती लागला नव्हता. २००२ मध्ये त्याने पश्चिम बंगाल येथे आई आणि तीन भावंडांची तर २००८ मध्ये वसईत मित्राची हत्या केली होती.

वसईत २००८ मध्ये वालीव येथे राहणाऱ्या मनोज साह (२५) याची हत्या झाली होती. किरकोळ वादातून मनोज साहच्या मित्र राजू शुक्ला याने ही हत्या केली होती. मात्र तेव्हापासून तो फरार होता. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा-२ च्या पथकाने हाती घेतला होता. शुक्ला हा गुजराथ मध्ये असल्याची माहिती पोलिसांनी मिळवली.

मात्र तो तेथूनही फरार झाला होता. त्यानंतर पोलिसांचे पथक बिहार राज्यातील सारण जिल्ह्यातील छपरा तालुक्यातील त्याच्या मुळ गावी गेले. पारपत्र पडताळणीसाठी आल्याचे सांगून पोलिसांनी त्याच्या निकटवर्तीयांकडून त्याचा मोबाईल क्रमांक मिळवला. त्यावरून तो कर्नाटक येथे असल्याची माहिती मिळाली. बंगळूर शहरात तो कुटुंबियासमवेत रहात होता. तेथे पोलिसांनी त्याला एका इमारीतच्या प्लंबिंगचे काम करायचे असल्याचे सांगून बालावून सापळा लावला आणि आणि अटक केली. मनोज साह याच्या हत्याप्रकरणात १७ वर्षांनंतर त्याला अटक करण्यात पोलिसांना यश आले होते.

### २००२ मध्ये कुटुंबातील चौघांची हत्या

राजू शुक्ला याच्या चौकशीच पोलिसांना धक्कादायक माहिती पोलिसांना मिळाली. राजू शुक्ला याचे मूळ नाव निरंजन शुक्ला होते. तो पश्चिम बंगाल मधील मिदनापूर जिल्ह्याती हल्दिया गावात वडील, सावत्र आई, आणि तीन सावत्र भावंडासह रहात होता. मात्र त्याची सावत्र आई नीट वागणूक देत नव्हती. त्यामुळे त्याने २६ फेब्रुवारी २००२ रोजी त्याने सावत्र आई गीताकुमारी शुक्ला, लहान बहिण पुजाकुमारी (७) प्रियाकुमारी आणि भाऊ मान (२) अशा चौघांची हत्याराने वार करून आणि गळा दाबून हत्या केली होती. त्यावेळी तो अवघ्या १७ वर्षांचा होता. पश्चिम बंगाल येथून कुटुंबातील चौघांची हत्या करून तो वसईत रहायला आला. तेथे त्याने राजू शुक्ला हे नाव धारण केले. वसईत तो किरकोळ काम करत होता. २७ मार्च २००८ रोजी त्याने किरकोळ वादातून वसई पूर्वेच्या वालीव येथील नाईकपाडा मध्ये कंपनीतील सहारी मनोज सहा याची डोके भींतीवर आपटून आणि दोरीने गळा आवळून हत्या केली होती.

# शहाड – टिटवाळा रस्त्याला वॉशिंग सेंटरचा विळखा

## बेकायदेशीर शेडमुळे वाहतुकीला अडथळा – प्रशासनाचा कानाडोळा

### अवैध पाण्याचा उपसा सुरू पालिका प्रशासनाचा होतोय दुर्लक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या अ प्रभाग सध्या बेकायदेशीर बांधकामांमुळे कमालीचा चर्चेत आहे. या भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत चाळी, शेडच्या स्वरूपातील दुकाने आणि वाढीव बांधकामे उभारली जात असून त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः शहाड व टिटवाळा निमकर नाका ते गणपती मंदिर रस्त्यावर बिनदिक्कतपणे उभारण्यात येणाऱ्या शेड आणि अनधिकृत वॉशिंग सेंटरमुळे हा मार्ग अरुंद होत चालला आहे. विमल पार्क जवळ या अतिक्रमणाविरोधात अनेक नागरिकांनी तक्रारी केल्या असल्या, तरी अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे प्रशासन मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का, असा प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित होत आहे.

शहाड ते मोहन-वडवली व टिटवाळा निमकर नाका ते गणपती मंदिर हे अतिशय महत्त्वाचे रस्ते आहेत. मात्र, या रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत शेडच्या स्वरूपात धाबे, हॉटेल्स, वॉशिंग सेंटर, चायनीज खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि अन्य बेकायदेशीर दुकाने उभारली गेली आहेत. विशेष म्हणजे, विमल पार्कजवळ तर चक्क इमारतीच्या कंपाऊंडला लागून शेड स्वरूपातील बांधकामे करण्यात आली आहेत.

अशीच परिस्थिती टिटवाळा निमकर नाका ते गणपती मंदिर पर्यंतच्या रस्त्यावर दिसून येत आहे. परिणामी, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहने रस्त्यावर उभी केली जातात, ज्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. ही कोंडी भविष्यात गंभीर दुर्घटनेला कारणीभूत ठरू शकते.

या वाढत्या अतिक्रमणावर नागरिकांनी अनेक वेळा लेखी तक्रारी केल्या आहेत. मात्र, अ प्रभाग अधिकारी बेकायदेशीर बांधकामांच्या तोडफोडीच्या प्रक्रियेत व्यस्त असल्याचे कारण देत या समस्येकडे कानाडोळा करत आहेत. परिणामी, परिसर दिवसेंदिवस अधिक अस्वच्छ आणि बकाल बनत आहे. शहर सौंदर्यीकरणाच्या नावाखाली डिव्हायडरमध्ये झाडे लावली जात असली, तरी या अनधिकृत बांधकामांमुळे त्याचा काहीही उपयोग होताना दिसत नाही.

या संदर्भात सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्याशी संपर्क साधला असता कारवाई सुरू आहे. आणि वॉशिंग सेंटर वाल्यांनी अधिकृत की अनधिकृत नळ जोडण्या घेतल्या आहेत हे पाणीपुरवठा विभाग याची चौकशी करेल.

स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना या वाढत्या अतिक्रमणाचा त्रास सहन करावा लागत असून, प्रशासन याकडे कधी लक्ष देणार, हा मोठा प्रश्न आहे.

# कांद्यावरील निर्यात शुल्क रद्द

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** केंद्र सरकारने देशभरातील कांदा उत्पादकांना दिलासा देत कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १ एप्रिलपासून होणार आहे. या निर्णयामुळे कांद्याची निर्बंधमुक्त निर्यात करता येणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील कांदापट्टयातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारच्या ग्राहक कल्याण मंत्रालयाने शनिवारी याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. केंद्र सरकारने देशांतर्गत कांद्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आणि कांद्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी कांद्यावर निर्यात शुल्क आणि किमान निर्यात मूल्य लागू केले होते, त्यानंतर ८ डिसेंबर २०२३ ते ३ मे २०२४ या पाच महिन्यांत निर्यात बंदी लागू केली होती. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कांद्यावरील निर्यात बंदी आणि किमान निर्यात मूल्याचे निर्बंध उठवण्यात आले होते. पण, १३ सप्टेंबरपासून २० टक्के निर्यात शुल्क लागू करण्यात आले होते.

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार ■ 24 मार्च 2025
४
jeevandeepvartanews2020@gmail.com

# सुरक्षा पाट्या नोंदणीसाठी बनावट संकेतस्थळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) पाटी बसवण्याच्या सूचना परिवहन विभागाने दिल्यानंतर आता त्याचाच फायदा घेऊन सायबर फसणूक केली जात आहेत. सायबर फसवणूक करण्यासाठी बनावट लिंकची निर्मिती केल्याचे निदर्शनास आले होते. पण आता सायबर भामट्यांनी थेट सरकारी संकेतस्थळाशी साधर्म्य असलेले बनावट संकेतस्थळ तयार केले आहे.

उच्च सुरक्षा क्रमांक पाट्यांच्या नोंदणीसाठी बनावट लिंकद्वारे फसवणूक करण्यात येत असल्याची तक्रार मुंबई पोलिसांकडे आली होती. सहाय्यक परिवहन आयुक्तांनी ५ मार्चला दक्षिण प्रादेशिक सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर फसवणूक करणाऱ्याविरुद्ध तक्रार दाखल केली. त्याप्रकरणी दक्षिण प्रादेशिक सायबर पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. पण सायबर फसणूक करणाऱ्या भामट्यांनी आता थेट सरकारी संकेतस्थळाप्रमाणे बनावट संकेतस्थळ बनवले आहे. 'बुक माय एचएसआरपी डॉट कॉम' नावानेच बनावट संकेतस्थळ करण्यात आले आहे. त्याद्वारे सामान्य नागरिकांची फसवणूक केली जात आहे. त्याची निर्मिती राजस्थानमधून असल्याचे सायबर तज्ज्ञांच्या तपासणीत निष्पन्न झाले आहे.

## आजी-आजोबा दिवसाच्या निमित्ताने एकत्र आल्या चार पिढ्या

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**कल्याण :** बालक मंदिर संस्थेच्या प्राथमिक शाळेचा नाविन्यपूर्ण उपक्रम दोन सत्रात घेण्यात आला. पहिल्या सत्रात आजी आजोबा दिवसाच्या या कार्यक्रमाच्या औचित्य साधून शिक्षक पालक संघातर्फे शुक्रवारी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधावा या विषयावर पालकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले, तर दुसऱ्या सत्रात आजी आजोबा दिवस साजरा करण्यात आला. या व्याख्यानासाठी व्याख्याते म्हणून प्राची गडकरी यांनी पालकांना त्यांच्या अमोघवाणीने संबोधित केले.

आपल्याकडे आजी-आजोबा म्हणजे दुधावरची साय असे वर्णन करण्यात आले आहे. मात्र बदलत्या काळात लुप्त होत चाललेल्या एकत्र कुटुंब पद्धतीचे महत्त्व अधोरेखित करणारा सुंदर कार्यक्रम कल्याणात संपन्न झाला. निमित्त होते ते आजी आजोबा दिवसाचे. ज्यामध्ये एकाच कुटुंबातील चार पिढ्या सदर उपक्रमात सहभागी झाल्या.

कल्याणातील बालक मंदिर संस्था प्राथमिक शाळेने आजी आजोबा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला. 'एकत्र कुटुंब पद्धत' ही भारतीय संस्कृतीची ओळख व पाया मानला जातो. पण काळाच्या ओघामध्ये हळूहळू एकत्र कुटुंब पद्धत लोप पावत चालली आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या या कार्यक्रमात शाळेतील पालकांच्या चार पिढ्या एकत्र आल्या होत्या.

आपल्या नातवंडांवर निस्वार्थ प्रेम करणाऱ्या व्यक्ती म्हणजे आजी-आजोबा. लहान मुलांमध्ये मूल होऊन खेळणारे, त्यांची काळजी घेणारे, नातवंडांच्या स्पर्शाची भाषा समजणारे म्हणजे आमचे आजी आजोबा. अशा या पाकात मुरलेल्या लोणच्यासारख्या आजी-आजोबांसाठी काहीतरी खास करावी म्हणून विविध कार्यक्रम घेतले गेले. त्यात गीत गायन, किर्तन, गाण्याच्या भेंड्या, संगीत खुर्ची, तबला वादन, कथाकथन, सामूहिक नृत्य, भजन, गवळण अशा कार्यक्रमांचा समावेश होता. सर्व आजी-आजोबांनी या कार्यक्रमात मनापासून भाग घेऊन आनंद लुटल्याचे दिसून आले. या कार्यक्रमासाठी मोहन आघारकर व मेघा आघारकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कामिनी पाटील यांनी तर पाहुण्यांची ओळख मंगेश घाटे यांनी करून दिली. शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पवार यांनी प्रास्ताविक, सोनजे यांनी आभार मानले. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षित रित्या शाळेत घेऊन येणारे व शाळा सुटल्यावर पुन्हा घरी घेऊन जाणाऱ्या रिक्षाचालकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पवार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व आजी-आजोबा, पालक व विद्यार्थी यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला.

## शांतता कमिटी जनतेमधील दुवा असतो- स.पो.नि.संदीपान सोनवणे!

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**झिडके-अंबाडी :** भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखालीच पोलीस स्टेशन अंतर्गत शांतता कमिटीची सभा अंबाडी नाका येथील कार्यालयात शनिवार दिनांक- 22/03/2025 रोजी संध्याकाळी ठीक 5.00वाजता आयोजित करण्यात आली होती. राज्यात नागपूर येथील हिंदू-मुस्लीम या धार्मिक वादातून जो धंगा झाला,त्याचे पडसाद अन्य ठीकाणी ऊमटून हिंदू-मुस्लीम समाजात जातीयवादातून दंगली होऊन, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठीच पोलीस यंत्रणेला अलर्ट राहावे लागले आहे.त्या दृष्टीकोनातून पोलीस स्टेशन अंतर्गत असणारी शांतता कमिटी ही प्रत्येक गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राहण्याबाबत उत्तमरीत्या कार्य करीत असतात,म्हणजेच शांतता कमिटी ही जनतेमधील कायदा व सुव्यवस्था राखण्याचा दुवा असतो.असे स्पष्ट मत यावेळेस संबंधित शांतता कमिटीसमोर व्यक्त करताना, सहायक पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे यांच्याकडून करण्यात आले.

सद्यस्थितीत समाजामध्ये सोशल मिडीयामुळे अनेक बऱ्यावाईट गोष्टी घडत आहेत,यातून धार्मिक कलह,किंवा इतर बाबतीत आपण जागृतता बाळगणे आवश्यक आहे,की जेणेकरून आपला गाव अथवा परिसरातील कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही याची दक्षता प्रत्येक नागरिकांकडून घेण्यासाठी शांतता कमिटी हे काम नक्कीच करेल,यात शंकाच नाही,म्हणूनच शासनाने प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत शांतता कमिटी स्थापन करण्याचा उद्देश आपल्या डोळ्यासमोर ठेवलेला आहे. यावेळेस पोलीस स्टेशन अंतर्गत अनेक विषय यावरही चर्चा करताना,अंबाडी नाका येथील अनधिकृत टपऱ्यां,व्यवसायिक, तसेच रिक्षाचालक, मिनीडोअर चालक व इतर वाहनचालक यांच्याकडून नाक्याचे होणारे विद्रूपीकरण, रोडलाईट, स्वच्छतागृह सी.सी.टीव्ही कॅमेरे यांच्यामुळेच येथील येणाऱ्या-जाणा-या नागरिकांच्या गैरसोईबाबत गांभीर्यपूर्वक सविस्तर चर्चा करून त्यावर लवकरच निवारण करण्याची कारवाई करण्याचे ठरविण्यात आले आहे. यावेळेस शांतता कमिटीचे सदस्य विकास जाधव, विजयगायकवाड, नवसु पाटील,मोनिका पानवे, दशरथ पाटील, नामदेव पाटील, केशव लाटे, मलंग शेख, आदिंने विविध समस्या मांडून त्या निवारण्यासाठी गणेशपुरी पोलीसांकडे विनंती केली आहे.

## जागतिक राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर प्रतिनिधी -** ठाणे जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शहापूर तहसीलदार कार्यालय आणि ग.वि.खाडे विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग. वि.खाडे विद्यालय व जुनियर कॉलेज शहापूर येथे जागतिक ग्राहक दिन संपन्न झाला.

या जागतिक ग्राहक दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ग्राहकांचे हक्क कर्तव्य व ग्राहकांना मिळणाऱ्या सुविधा या संदर्भात मार्गदर्शन होत असते याच हेतूने शहापूर तहसीलदार कार्यालयातील पुरवठा निरीक्षक डॉक्टर अमृता सूर्यवंशी व प्रीती जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून ग्राहकाची कर्तव्य, त्यांचे हक्क व कोणत्याही वस्तूच्या खरेदीनंतर दुकानदाराकडून किंवा ज्या व्यक्तीकडून आपण कोणतीही सेवा विकत घेत असतो त्या वस्तूची, त्या सेवेची पावती आवश्यक घ्यावी असे स्पष्ट केले. तर आपण सर्वांनी ग्राहक बनावे कोणत्याही दुककानदाराचे आपण गिऱ्हाईक बनू नये असे प्राध्यापक दिगंबर खरात यांनी म्हटले.

याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर तळपाडे, उपप्राचार्य रविंद्र खरात, प्राध्यापक दिगंबर खरात, शरद विशे, शिक्षक व शिक्षकेतर आदीजण यांनी उपस्थिती दर्शवून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक दिगंबर खरात यांनी केले.

## शासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये तक्रार समिती गठीत करा - जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**पेण :** कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम 2013 अंतर्गत ज्या शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती गठीत केलेली नाही त्यांनी तात्काळ समितीचे गठन करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना सादर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिल्या आहेत.

अधिनियमातील प्रकरण 1 मधील कलम 2 व्याख्येनुसार प्रत्येक शासकीय, निमशासकीय कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, संस्था शाखा ज्यांची शासनाने स्थापन केलेली असेल किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असेल किंवा अंशतः प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष निधी शासनामार्फत किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी नगरपरिषद किंवा सहकारी संस्था यांना दिला जातो अशा सर्व आस्थापना तसेच कोणतेही खाजगी क्षेत्र संघटना उपक्रम, संस्था, एंटरप्रायझेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक करमणुक, औद्योगिक, आरोग्य इ. सेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालय, सुश्रूषालये, क्रिडा संस्था इ. ठिकाणी किंवा अधिनियमात नमूद कामाच्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कार्यालयाच्या ठिकाणी अंतर्गत तक्रार समितीगठीत करावयाची आहे.

जिल्ह्यातील शासकीय व खाजगी आस्थांनामध्ये 10 किंवा 10 पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या काही प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, इंग्लिश मेडियमस्कुल, मॉल्स, शॉप, मोठी दुकाने, कारखाने, औद्योगिक कंपन्या, मल्टिपरपज हॉस्पिटल, हॉस्पिटल्स, सहकारी पतसंस्था, बँका याठिकाणी अद्याप स्थानिक तक्रार समिती स्थापन झालेली नाही त्यांनी लवकरात लवकर समिती गठीत करावी अन्यथा कायद्यांतर्गत 50 हजार रुपये दंडाची तरतुद आहे.

या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व आस्थांपनांनी तक्रार समितीगठण करुन अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय दीप महल बंगला, दुसरा मजला, स्वामी समर्थ नगर, पिंपळभाट-चेंढरे, रायगड-अलिबाग ई मेल dwcdoraigad @gmail.com या कार्यालयास सादर करावा.

## मुरबाड पोलीस स्थानकाचा कायापालट

**या पुर्वी सामान्य नागरिक कोणत्याही पोलीस स्टेशनला जाणे म्हणजे त्याला भितीदायक वाटायचे. त्यामुळे पोलीस स्टेशनला येऊन तक्रार करण्यास सहसा तयार होत नसत.परंतु अशा प्रकारचे चांगले वातावरण निर्मिती केली असेल तर निश्चित नागरिकांचा पोलीसांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल.**
**- जगदिश शिंदे,**
**उपविभागीय पोलिस अधिकारी मुरबाड**




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड-प्रतिनिधी :** मुरबाड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार किसन कथोरे यांनी काही वर्षापूर्वी मुरबाड पोलीस स्टेशनच्या इमारतीसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करुन देऊन एक सुसज्ज भव्य असे पोलीस ठाणे,पोलीस अधिकारी निवास , पोलीस कर्मचाऱ्यांना वसाहत अशा सर्व सोयी उपलब्ध करून राज्यात एक दर्जेदार पोलीस ठाणे तयार केले होते. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या इमारतीचे लोकार्पण केले होते.

पोलीस स्टेशन म्हटले की सामान्य माणूस आपल्यावर अन्याय झाला असला तरीही त्या ठिकाणी जाण्यास टाळाटाळ करत असतो. नको ती पोलीसांची कटकट असे बोलत असतो परंतु मुरबाड मध्ये हा बदल घडून आणण्याची किमया येथे येणार्या प्रत्येक पोलीस अधिकारी यांनी करून दाखविली आहे.मग यामध्ये पो. नि.बोराटे, पो.नि.प्रसाद पांढरे, पो.नि.बाबर यांनी यापूर्वी आपले योगदान देऊन हे पोलीस ठाणे कसे सुसज्ज करता येईल यासाठी प्रयत्न केले.

तद्नंतर आताच रूजु झालेले पो.नि.गिते यांनी पोलीस अधिक्षक ठाणे ग्रामीणचे डी.एस.स्वामी व डी.वाय.एस.पी.जगदिश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड पोलीस ठाण्याचे रूपडेच पालटले असून ईमारतीला केलेली रंगसजावट,दर्शनी भागातुन वर चढताना केलेले सुंदर नक्षीकाम,जिन्यावर ठेवलेल्या कुंड्या मधील झाडे, येणार्याचे मन प्रसन्न करून जाते . वर गेल्या नंतर मुख्य व्हरांड्यात अभ्यंगताना बसण्यासाठी जागा,समोर मोठा स्क्रीनचा टि. व्हि. ,याचबरोबर फ्री वायफाय सुविधा आणि विशेष म्हणजे नागरिकांसाठी मोफत वाचनालयाची सोय करणारे कदाचित महाराष्ट्रातले हे पहिले पोलीस ठाणे असावे.याज बरोबर नागरिकांना कोणतिही तक्रार किंवा अडचण असल्यास पोलीस अधिकारी यांना भेटण्या करता सकाळी 11 ते 2 अशी वेळ निश्चित ठेवण्यात आली आहे. तसेच मुरबाड पोलीस स्टेशनचा व्हाट्सअप नंबर 8657936964 हा नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.अशा प्रकारचे अद्यायावत,सुसज्ज व मन प्रसन्न करणारे पोलीस ठाणे राज्यात क्वचितच पाहायला मिळतील.या कामी वरिष्ठ पोलिस अधिकार्यांसह, सर्व पोलीस कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

## रांधे गावात अखंड स्वामी कथेचे आयोजन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**पारनेर तालुक्याच्या इतिहासात प्रथमच श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कथेचे प्रवचन आयोजीत करण्यात आले आहे . यातून श्री स्वामी समर्थ महाराजांचे जीवन चरित्र प्रवचनाच्या माध्यमातून उलगडून सांगण्यात येणार असून त्यातून श्री स्वामी समर्थ महाराजांची महती कळणार आहे .**

श्री स्वामी समर्थ प्रकट दिन आणि प्राणप्रतिष्ठा सोहळयानिमित्ताने रांधे येथील माळवाडी मध्ये श्री क्षेत्र पैठण येथील प्रसिद्ध ज्ञानमार्तंड हभप नारायण महाराज काळे यांच्या सुश्राव्य वाणीतून गुरुवार दि . २७ ते सोमवार दि . ३१ रोजी अखंड श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कथेचे प्रवचन आयोजीत करण्यात आले असल्याची माहिती श्री स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अनिलराव आवारी यांनी दिली .

गुरुवार दि . २७ ते सोमवार दि . ३१ पर्यंत दररोज सायंकाळी ७ . ३० ते ९ . ३० वाजेपर्यंत जन कल्याण व विश्वशांती साठी रांधे येथील माळवाडी च्या श्री स्वामी समर्थ देवस्थान च्या विद्यमाने थोर संत श्रेष्ठ एकनाथ महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री क्षेत्र पैठण येथील ज्ञानमार्तंड हभप नारायण महाराज काळे यांच्या सुश्राव्य वाणीतून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कथेची प्रवचन सेवा आयोजीत करण्यात आली असून गुरुवार दि . २७ ते शनिवार दि . २९ पर्यंत बाभुळवाडे चे श्री केदारेश्वर प्रासादिक भजनी मंडळ , रांधे चे श्री विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ , दरोडी चे हनुमान प्रासादिक भजनी मंडळ यांचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम होणार आहे . तर रविवार दि . ३० रोजी वडझिरे येथील विठ्ठल रुक्मिणी पायी दिंडी सोहळा आयोजीत करण्यात आला असून गजानन , हनुमान , श्रीराम , भैरवनाथ, संगमेश्वर , सिध्देश्वर , विठ्ठल , चोंभेश्वर , खोडदेबाबा , रेणुकामाता प्रासादिक भजनी मंडळांचा भजन सेवेचा कार्यक्रम संपन्न होणार आहे . अखेरच्या टप्प्यात सोमवार दि . ३१ रोजी सकाळी ७ . ३० ते दुपारी १२ . ३० वाजता यज्ञ व प्राणप्रतिष्ठा विधी व सायंकाळी ५ ते रात्री ८ . १५ वाजता रांधे येथील ग्रामदैवत रांधु आई , प्रति पंढरपूर असलेले विठ्ठल रुक्मिणी , चारंग बाबा , भैरवनाथ , हनुमान महाराज , श्री गुरुदेव दत्त , श्री खंडोबा या देवांच्या व श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भेटी व भव्य पालखी मिरवणूक आणि वितरण सोहळा आयोजीत करण्यात आला आहे .

रात्री ९ . ३० ते ११ वाजेपर्यंत थोर उदार व दानशूर अन्नदाते यांच्या लोकसहभागातून अन्नदान महाप्रसाद करण्यात येणार असून रात्रीच्या वेळी फटाक्यांची आतिषबाजी आयोजीत करण्यात येणार आहे , तर भव्य सोडत योजनेव्दारे ई बाईक , फ्रिज , एल ई डी टि व्ही , वॉटर फिल्टर हे बक्षीसे भाग्यवान भाविक भक्तांना देण्यात येणार आहे , तरी धर्मानुरागी परमार्थ प्रेमी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या आबालवृद्ध महिला व पुरुषांनी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने व श्रद्धेने या अखंड श्री स्वामी समर्थ महाराजां ची कथा प्रवचन श्रवण करण्यासाठी व तद्नंतर च्या महाप्रसादाचा लाभ घ्यावा , असे आवाहन ही श्री स्वामी समर्थ देवस्थान च्या वतीने करण्यात आले आहे .

## कल्याणकरांनी अनुभवला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागा तर्फे दिनांक शुक्रवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षा निमित्त " नृत्येश्वर फाऊंडेशन ऑफ आर्ट्स अँड कल्चर" यांच्या वतीने भव्य कार्यक्रम आचार्य अत्रे रंगमंदिर कल्याण येथे सादर करण्यात आला. या कार्यक्रमातून कल्याणकरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास अनुभवला.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या मार्गदर्शनाने तसेच सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या सहकार्याने, अप्पर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विकास खारगे, सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे, व उपसंचालक श्रीराम पांडे यांच्या मार्गदर्शनाने हा कार्यक्रम पार पडला. कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांनी विशेष मदत केली.

या कार्यक्रमासाठी उपस्थित पोलिस उपआयुक्त अतुल झेंडे यांनी इतिहास जिवंत राहिला पाहिजे,आजच्या पिढीला तो कळला पाहिजे म्हणून महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक विभागातर्फे येणारा हा कार्यक्रम स्तुत्य व चांगला आहे असे आपल्या भाषणात नमूद केले. कार्यक्रमात भाजपा जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, शशिकांत कांबळे, रिपब्लिकन पार्टी उपाध्यक्ष अरुण रोकडे उपस्थित होते. अमित गायकवाड, दीपेश गायकवाड व दिव्या शिंदे( युवती प्रमुख भाजपा) यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात विशेष सहकार्य केले. उपस्थित पाहुण्यांचे स्वागत अक्षया मेस्त्री यांनी तुळशीचे रोप देऊन केले. दिपश्री कवळे, विहान कपूर, संदेश प्रभाकर, राहुल साळवी, किशोर देसाई, कविता जाधव, बाल कलाकार स्पृहा, नैतिक, पीयूष आणि सिने अभिनेत्री पूनम विणेकर या कलाकारांनी भाग घेतला होता. या कार्यक्रमाचे दिग्दर्शन शशिकांत मेस्त्री व सहाय्यक व तांत्रिक दिग्दर्शन म्हणून सिद्धेश मेस्त्री यांनी केले. ओंकार मुलजकर व प्रशांत कुडे ह्यांनी सहाय्यक म्हणून काम पाहिले.

## जिल्हा परिषदेत शहिदांना अभिवादन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी , दि.23 :** जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभाग येथे, शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी पशुसंवर्धन विभागाच्या कनिष्ठ प्रशासन अधिकारी एस. एस. चवाथे, शिक्षण व महिला व बालकल्याण विभागातील विस्तार अधिकारी, शिपाई सुरेश शिंदे, तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

## मुरबाड तालुका कृषी कार्यालयाकडून शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढण्याचे आवाहन!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड दि.२३ :** मुरबाड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सुचित करण्यात येते की कृषी विभागाच्या पीएम किसान, पिक विमा, महाडीबीटी पोर्टलवर योजना, नानाजी देशमुख कृषी अधिकारी प्रकल्प. नैसर्गिक आपत्ती अनुदान, पिक कर्ज यासारख्या इतर सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) काढणे सर्व शेतकऱ्यांना बंधनकारक आहे. यासाठी सर्व शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येते की ३१ मार्च २०२५ पर्यंत जवळच्या (सिएससी), केंद्रावर जाऊन आपले ओळखपत्र लवकर काढून घ्यावे असे आवाहन मुरबाड तालुका कृषी अधिकारी नामदेव धांडे यांनी केले आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com